**<u>नि.फौ.ख.क्र.९५७/२०२२.</u>**

**<u>निशाणी क्र.२०/क</u>**

**<u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र.०१.</u>**

**मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,**

| | | |
|---|---|---|
| **नाव** | – | पुनम सर्जेराव पाटील, |
| **वय** | – | ३६ वर्षे, धंदा – शेती व गृहिणी. |
| **रा.** | – | दिंडनेर्ली, ता.करवीर, जि.कोल्हापूर. |

**<u>सरकारतर्फे सरतपासणी घेणार सरकारी वकिल श्री.सरनोबत यांच्या मार्फत शपथेवर सुरु...</u>**

**०१.** घरी मी, माझे पती व दोन मुले असे राहतो. माझे पती एल.आय.सी. ॲडव्हायझर आहेत. कृष्णात शंकर पाटील हे माझ्या शेजारी राहतात. ते माझे चुलत दीर आहेत. कांचन पाटील ही कृष्णात यांची पत्नी आहे. त्यांचा जनावारांचा गोठा व आमच्या जनावारांचा गोठयामध्ये रस्ता आहे. आमच्या जनावरांचा गोठा कृष्णात यांच्या घराच्यासमोर आहे. कृष्णात यांच्या जनावारांचा गोठा त्यांच्या घराच्या पश्चिम बाजूस आहे. कृष्णात हे शेती करीत असुन ते शिक्षक आहेत. तसेच ते महिलांकडून बिशी गोळा करतात. मी सुध्दा त्या बिशीमध्ये महिन्याला पैसे टाकते. माझे बिशी मध्ये रु.१,११,०००/– जमले होते. ती बिशी वर्षातुन एकदा जानेवारीमध्ये फुटते. सन २०२१ मधील बिशीचे पैसे ते देत नव्हते म्हणुन आम्ही सारखे बिशीचे पैसे द्या असे मागत होतो. आम्ही पैसे मागत होतो तेव्हा ते आज देतो उद्या देतो असे म्हणत होते आणि पैसे देत नाही असे सुध्दा म्हणत होते.

**०२.** दि.१२/०२/२०२२ रोजी संध्याकाळी ०५.४५ वा.च्या सुमारास मी जनावारांची धार काढण्यासाठी गेले होते. त्यांनी कुत्रा पाळला आहे. तो कुत्रा आमच्या

जनावारांच्या वैरणीवर, गोठयात घाण करत होता. त्यावेळी मी सुजाता बळी पाटील, कांचन हिची जाऊ हिला फोन केला. तिला कुत्रा घाण करत आहे असे सांगितले. तिचे माझे फोनवर बोलणे चालत होते. मी तिला सांगत होते की, कुत्रा घाण करतो सावर उद्या शिवन क्लासला जायचे आहे असे सांगत असताना कृष्णात यांची पत्नी शिव्या द्यायला सुरुवात केली. मी कांचन हिला का शिव्या देत आहे हे विचारायला गेले. तेव्हा दोघांनी मिळुन मला धरले. कांचन हिने माझे केस ओढून माझ्या कानाखाली मारली. कृष्णात याने माझ्या अंगात असलेला कॉफी रंगाचा, टिपके असलेला ब्लाऊज डाव्या बाजुच्या हातावर फाडला. त्यामुळे माझ्या मनास लज्जा उत्पन्न झाली. त्या झटापटीत माझे मंगळसुत्र तुटून खाली पडले नंतर ते मला सापडले. ते भांडण पांडुरंग किटे व सुजाता बळी पाटील यांनी सोडविले. माझे ब्लाऊज फाटले. माझे पती घरी नव्हते. मी पोलीस ठाण्याला तक्रार देण्यासाठी पाई अर्ध्या वाटेपर्यंत गेले. जात असताना पतींना फोन करुन घटना सांगितली. माझे पती अर्ध्या वाटेत आले. आम्ही दोघे पुढे इस्पुर्ली पोलीस ठाणे येथे जाऊन सदर घटनेची फिर्याद दिली. आता मला दि.१२/०२/२०२२ रोजीचा वर्दी जबाब दाखविण्यात आला. त्यावर माझी स्वाक्षरी आहे. त्यामधील मजकुर खरा व बरोबर आहे. म्हणुन त्यास **निशाणी क्रमांक २१** देण्यात येत आहे. त्या अनुषंगे प्रथम खबर अहवाल नोंदविला. त्यास **निशाणी क्रमांक २२** देण्यात येत आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर असुन त्यावर माझी सही आहे. दुस–या दिवशी येऊन पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला. ती जागा आम्ही पोलीसांना दाखविली. पोलीसांनी पंचनामा करतेवेळेस घटनास्थळाचा फोटो काढला आहे. त्यात मी हजर आहे. म्हणुन फोटोस ''अर्टिकल अ'' देण्यात येत आहे. माझा फाटलेला ब्लाऊज पोलीस ठाण्यामध्ये जप्त केला आहे. यापुर्वी न्यायालयात जबाब देण्यासाठी आले होते. त्यावेळेस मी न्यायालयास घडलेला सर्व प्रकार आजप्रमाणे त्यादिवशी देखील सांगितला होता. आता मला फौ.प्र.सं.कलम १६४ अन्वये दि.१५/०२/२०२२ रोजी नोंदविण्यात आलेला जबाब दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. म्हणुन त्यास **निशाणी क्रमांक २३**

देण्यात येत आहे. आरोपी हे घराशेजारी राहत असल्याने व नातेवाईक असल्याने मी त्यांना ओळखू शकते. आज रोजी आरोपी गैरहजर आहेत. जप्त मुद्देमाल फाटलेला ब्लाऊज पोलीसांनी जप्त केला. तो दाखविले असता मी ओळखू शकते.

**आज रोजी न्यायालयात जप्त मुद्देमाल हजर नसल्याने त्या अनुषंगे पत्र पाठविले असल्याने सदरचा सरतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात येत आहे.**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत,

MAHADEVI SHIVRAJ MANAGULI

Digitally signed by MAHADEVI SHIVRAJ MANAGULI Date: 2024.09.05 17:14:59 +0530

(श्रीमती एम.एस.मनगुळी)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.६, कोल्हापुर.

दि.०५/०९/२०२४.